## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :- २५५/२०२३/जळगांव**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्रीमती. शोभाबाई सदाशिव शिंदे<br>रा. मौजे भोरटेक, पो. कजगांव,<br>ता. भडगांव, जि. जळगांव | ग्रामसेवक,<br>भोरटेक ब्रु., ग्रामपंचायत कार्यालय,<br>भोरटेक ब्रु. ता. भडगांव,<br>जि. जळगांव |

**सुनावणी दिनांक १४/१२/२०२३**

तक्रारदार यांनी दिनांक १०/०३/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १४/१२/२०२३ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार अनुपस्थित असुन विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १०/०३/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार अपूर्ण माहिती उपलब्ध करून दिली.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ११०६/२०१९/जळगांव संदर्भात दिनांक २३/११/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यलय, भोरटेक बु. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १९/१०/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

४) सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदार यांना दि. ०५/१२/२०२२ रोजी महसूल विभाग यांचेकडून उपलब्ध झालेली माहिती प्रत्यक्ष पुरविण्यात आलेली आहे. तक्रारदार यांची सदर माहिती मिळाली, काही तक्रार राहिलेली नाही. अशी पोच आयोगास सादर केली आहे.

तसेच आजच्या सुनावणीस तक्रारदार अनुपस्थित असल्यामुळे कोणती माहिती अपूर्ण मिळाली याचा बोध झला नाही. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक २५५/२०२३/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

0 6 MAR 2024